**<u>प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. जे. के. देशपांडे यांच्या तर्फे वादी साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास सुरू-</u>**

**१४.** दावा मिळकतीचा सर्वे नंबर १२५ आहे. स.न. १२५ मध्ये विमलबाईची ३ हे. आणि काही तरी वडिलोपार्जीत जमिन होती. माझ्या शपथपत्र परिच्छेद क्र.२ मध्ये विमलबाईने खरेदी केलेला मिळकतीचा नंबर नमूद आहे. ती जमिन पश्चिमेकडून खरेदी घेतली आहे. मी त्या व्यवहारावेळी हजर नव्हतो. मला त्या व्यवहाराची व्यक्तीशा माहिती नाही. त्या खरेदीच्या पूर्वी करारपत्र झाले होते का, याची मला माहिती नाही. त्या मिळकतीचा साहेबराव यांनी विमलबाईला ताबा खरेदीपत्र झालेनंतर दिला. ताबा देतेवेळी जमिनीची मोजणी केली नव्हती. खरेदीपत्रातील मिळकतीसह वादीकडे किती मिळकत होती, हे मला माहित नाही.

**१५.** मी तुकडे बंदी तुकडे जोड प्रक्रियेतील स.न. १२५ बाबतचा ९(३) ९(४) चा उतारा पाहिलेला नाही. तुकडे बंदी तुकडे जोड प्रक्रियेमध्ये स.न. १२५ मध्ये समाविष्ठ असलेल्या गटाच्या क्षेत्रात बदल झाला नव्हता. स.न. १२५ मध्ये समाविष्ठ असलेल्या वादीच्या तिन्ही गटांचे एकूण क्षेत्र मला सांगता येत नाही.

**१६.** मी किंवा वादीने प्रतिवादी विरुध्द भूसंपादन अधिकाऱ्याकडे क्षेत्राबद्दल तक्रार केली नव्हती. वादीच्या क्षेत्रातील कांही क्षेत्र जिल्हाधिकारी यांनी संपादित करुन प्रतिवादी यांना दिले, त्या क्षेत्राबाबत मी किंवा वादीने आक्षेप घेतलेला नव्हता. भूसंपादनाच्या वेळेस झालेली मोजणी वादीच्या उपस्थितीत झाली होती, हे मला माहित नाही. गट क्र. ३८९ मधील ०२ गुंठे क्षेत्र, गट क्र. ३९२ मधील २२ गुंठे आणि गट क्र. ३९५ मधील २६ गुंठे क्षेत्र प्रतिवादीकरिता संपादित केले होते. गट क्र. ३९२ मधील क्षेत्र मल्लीकार्जून रामराव लक्षटे यांना विक्री केलेल्या व्यवहाराची मला माहिती नाही. त्या

खरेदीपत्रावेळी खरेदी क्षेत्राची मोजणी केली होती का, हे मला माहित नाही. ३३ के.व्ही चे उपकेंद्र केंव्हा बांधले, हे मला माहिती नाही. भूसंपादनावेळी मोजणी करुन ज्या हद्दी निश्चित करुन कब्जा दिला, त्याच हद्दी आज ही अस्थीत्वात आहेत. सन २००० मध्ये ताबा घेतला तेंव्हाच तारेचे कुंपन घातले आहे. त्या कुंपनाबाबत आम्ही आक्षेप घेतलेला नाही. संपादित केलेल्या क्षेत्रामध्येच कुंपन घातले आहे.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने वादीचे क्षेत्रात कसलेही अतिक्रमण केले नाही. ते अतिक्रमण सन २००० मध्ये झाले आहे. त्या अतिक्रमणाबाबत दावा दाखल करणेपूर्वी आम्ही कारवाई केली नाही. ३३ के.व्ही उपकेंद्रासाठी वादीच्या जमिनीशिवाय अन्य कोणाची जमिन संपादित केलेली नव्हती. मी त्या संपादनाच्या प्रक्रियेतील अवार्ड पाहिलेले नाही. मोजणी अहवालावर माझे वकीलांनी दिलेले म्हणणे मला मान्य आहे. स.न.१२५ मधील गट क्र. ३९५ मधील जमिनीमध्ये पश्चिमेकडील १४ गुंठे क्षेत्रामध्ये प्रतिवादीने अतिक्रमण केले आहे. इतर दोन गटामध्ये प्रतिवादीने अतिक्रमण दाखवलेले नाही. प्रस्तुतचा दावा वादीने दाखल केला आहे. दाव्यामध्ये प्रतिवादीने ७० गुंठे अतिक्रमण केले, असे लिहिले आहे. मुळ दावा आणि दुरुस्ती दावा याचेमध्ये असलेल्या अतिक्रमीत क्षेत्रातील भिन्नतेबाबत मला सांगता येत नाही.

**१८.** मोजणी करण्यापूर्वी आम्हाला अतिक्रमीत क्षेत्राबाबत उलगडा झाला होता. तो उलगडा आम्ही केलेल्या कच्चया मोजणीमध्ये झाला होता. कच्ची मोजणी बरोबर होती. विक्री व संपादनामधून वादीचे उरलेले क्षेत्र किती होते, याचा पुरावा मी दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, तार कुंपन घालतांना प्रतिवादीने अतिक्रमण केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने कोणतेही अतिरिक्त क्षेत्र ताब्यात घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, कच्ची मोजणी केल्याचे मी खोटे सांगत आहे. न्यायालयाच्या आदेशापूर्वी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांच्याकडून स.न. १२५ मधील

पूर्ण क्षेत्राची मोजणी करुन घेतलेली नाही. दावा दाखल करणेपूर्वी प्रतिवादीला दिलेल्या नोटीसची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण. फेर तपास नाही.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,**

GUNJAVATE APARNA SHIVAJI
Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.10.18 11:36:37 +0530

**(श्रीमती ए.एस.गुजवटे)**

**दिनांकः– १५/१०/२०२५.** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा.**
**ठिकाणः– निलंगा.** **जिल्हा लातूर.**